**नियमित दिवाणी दावा क्र. १६७/२००४ निशाणी १३५ खालील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया आदेश ६ नियम १७ व कलम १५१ अन्वये दाखल दाखल केलेला असून दाव्यात सुचविलेली दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेची विनंती केली आहे.

२. वादीचे थोडक्यात कथन असे आहे की, प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादींच्याविरुध्द वाटप व कब्जा मिळणेकरीता दाखल केला आहे. वादीने दाव्यामध्ये नि.क्र. १०६ दाखल करुन दावा दुरुस्त करण्याची परवानगी मागितली. परंतु, सदरचा अर्ज अंशतः नामंजुर झाल्याने सदर आदेशाच्या विरोधात वादीने मा. उच्च न्यायालयात याचिका क्र. ६४४१/२०१४ दाखल केला. सदर याचिकेमध्ये देखील दाव्याच्या परिच्छेद क्र. १२ व विनंती सदरामध्ये १/४ ऐवजी १/३ करण्यात आले. सदरची चुक ही अनावधानाने झाल्यामुळे मुळ दाव्यामध्ये हिस्सा १/४ कायम ठेवुन १/३ हिस्सा रद्द करण्यास परवानगी मिळण्याची विनंती केली आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही.

३. प्रस्तुत अर्जास म्हणणे प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांनी दाखल करुन प्रस्तुतचा अर्ज कायदेशीर तरतुदी अन्वये नसुन वादी केवळ वारंवार दाव्यात दुरुस्त्या सुचवुन दाव्याचे कामकाज लांबणीवर टाकत आहे. करीता अर्ज नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

४. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकला. पुढील मुद्ये उपस्थित होतात त्यांचेवरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह नोंदवित आहे :

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादीने दाव्यामध्ये सुचविलेली दुरुस्ती करुन मिळणेस पात्र आहे काय? | ...होकारार्थी |
| २ | आदेश काय? | वादीचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्या क्रमांक १ बाबतः</u>**

५. वादीचा अर्ज त्यावरील प्रतिवादीचे म्हणणे, दावा व दाव्याची कैफियत दाखल कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले. तसेच दिवाणी प्रक्रिया आदेश ६ नियम १७ अन्वये,

**<u>वादकथनातील सुधारणा</u>**:— न्यायालयास कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर दोहोपैकी कोणत्याही पक्षकारास, त्याच्या वादकथनास, न्याय असेल अशा रीतीने व अशा अटीवर फेरबदल करण्याची किंवा सुधारणा करण्याची मुभा देण्यात येईल आणि पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व सुधारणा केल्या पाहिजे. परंतु न्यायचौकशी सुरु झाल्यानंतर, पक्षकाराने योग्य ती खबरदारी घेउनसुद्धा न्यायचौकशी सुरु होण्यापूर्वी ती बाब पुढे आणता आली नाही याबाबत न्यायालयाचे समाधान झालेले असल्याखेरीज सुधारणेसाठीचा अर्ज अनुज्ञेय असणार नाही.

६. दिवाणी प्रक्रिया आदेश ६ निशाणी १७ मधील कायदेशीर बाबीचा परामर्श घेताला तसेच मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयाच्या पुढील न्यायनिर्णयाचे अवलोकन केले. *(ए.आय.आर. १९८० मद्रास १०५; ए.आय.आर. १९६५ सु.को. ११४४; ए.आर.आर. १९६४ सु.को. ९९३. जर प्रस्तावित सुधारणेमुळे (अ) विरुद्ध बाजूस अन्याय होणार नसेल व (ब) दाव्यांतील खरे प्रश्न निकालात काढणे करीता आवश्यकता असेल तर त्या दुरुस्तीस परवानगी दिली पाहिजे.)*

७. वादीने सदर प्रस्तुतची दुरुस्ती ही अनावधानाने झाल्याची बाब शपथेवर मान्य केलेली आहे. मा. उच्च न्यायालयाची याचिका क्र. ६४१४/२०१४ मध्ये झालेल्या आदेशान्वये वादीस दाव्यामध्ये हिस्सा १/४ ऐवजी १/३ करण्यास मान्यता देण्यात आली नव्हती. परंतु, इतर दुरुस्तीस मान्यता देण्यात आल्याने वादीने दुरुस्ती अर्ज दाखल करताना प्रस्तुत न्यायालयाच्या नि.क्र. १०६ ची मागणी समोर ठेवुन सदरची दुरुस्ती केल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे झालेली दुरुस्ती रद्द

करण्यास परवानगी देणे न्यायोचित ठरते. प्रस्तुत दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात अथवा प्रतिवादीच्या कथनांस कोणतीही बाधा पोहोचत नाही. याउलट, सदर दुरुस्तीमुळे न्यायदान प्रक्रियेत स्पष्टता येवुन दोन्ही पक्षकारांना योग्य न्याय मिळणेस मदतच होणार आहे. वादीचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ तसेच कमल १५१ च्या कक्षेत येत असल्याची बाब वादीने पुराव्यानिशी सिध्द केलेली आहे. करीता मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदविण्यात येत आहे.

**मुद्दा क्रमांक २ बाबत:**

८. मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदविल्याने वादीचा अर्ज मंजुर होणेस पात्र आहे. करिता मुददा क्र. २ चे उत्तराकरिता पुढील आदेश पारित करित आहे :

**आ दे श**

**१.** वादीचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

**२.** वादीने दाव्यात सुचविलेली दुरूती विहित मुदतीत करावी, तसेच दुरूस्त दाव्याची प्रत विहित मुदतीत दाखल करण्याचे आदेशित करण्यात येत आहे.

**३.** खर्चाबाबत आदेश नाही.

सही/—

**( मीना प्र. एखे )**

दि. ३०/०१/२०१९

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, गेवराई